# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:23.01.2026** **वार:शुक्रवार**

1. दावोसमध्ये महाराष्ट्राने 30 लाख कोटींचे सामंजस्य करार केल्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती
2. राज्यातील 29 महानगरपालिकांच्या महापौरपदांचं आरक्षण जाहीर; 15 महापालिकांमध्ये होणार महिला महापौर
3. पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा समारोप; मराठी विभागात 'बाप्या' ठरला सर्वोत्कृष्ट चित्रपट आणि
4. जम्मू आणि काश्मीरमध्ये रस्ते अपघातात 10 जवानांचा मृत्यू; 10 जण गंभीर जखमी

**मुख्यमंत्री-दावोस**

दावोसमध्ये आयोजित जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्राने 30 लाख कोटी रुपयांचे गुंतवणूक करार केले असून, आणखी 10 लाख कोटींच्या गुंतवणूक करारांची प्राथमिक बोलणी पूर्ण झाली आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. यातून 40 लाख रोजगार निर्मितीचं उद्दिष्ट साध्य होणार आहे असं त्यांनी सांगितलं. राज्यातल्या माध्यमांच्या प्रतिनिधींशी दावोस इथून दूरस्थ माध्यमातून त्यांनी काल संवाद साधला, नवी मुंबई विमानतळाच्या जवळ टाटा समुहाच्या मदतीनं नवोन्मेष शहर उभारलं जाणार आहे. मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रासह राज्याच्या सर्वच भागात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली जाणार आहे, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. ते म्हणाले......

**गुंतवणुकीचे करार जे आपण केले आहेत किंवा जे काही गुंतवणुकीच्या अनाउंसमेंट आपण केलेल्या आहेत. त्या तीस लाख कोटी रुपयाच्या आहेत आणि याच्या व्यतिरिक्त सात ते दहा लाख कोटी रुपये अजून अशा स्टेज ला आहेत, की ज्या संदर्भात आपली प्राथमिक बोलणी झालेली आहे. त्या ठिकाणी संदर्भातलं काही एक प्रकारचं एग्रीमेंट ही झालंय पण पुढच्या महिन्या किंवा दोन महिन्यामध्ये एक्चुअल एमओयू च्या स्टेज ला ते येतील. त्यामुळे एक अतिशय यशस्वी अशा पद्धतीची गुंतवणूक आपल्याला, प्राप्त झालेली आहे. विशेषतः मला हे सांगितलं पाहिजे की ही जी काही गुंतवणूक आहे. यामध्ये इंडस्ट्री सेक्टर आहे, याच्यामध्ये सर्व्हिस सेक्टर आहे, याच्यामध्ये एग्रीकल्चर आहे, याच्यामध्ये टेक्नॉलॉजीचं क्षेत्र आहे. सगळ्या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात ही इन्व्हेस्टमेंट केलेली आहे. जी इन्व्हेस्टमेंट आपल्याकडे येतेय त्याचा जर आपण एकूण हिशोब लावला तर याच्यामध्ये त्र्याऐंशी टक्के जे काही करार आहेत एकूण करारांपैकी यामध्ये एफडीआय आहे. फोरेन डायरेक्ट इन्व्हेस्टमेंट आहे.**

**महापौर आरक्षण**

राज्यातील 29 महानगरपालिकांमधील महापौर पदाची आरक्षणाची सोडत नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली काल काढण्यात आली. पुढील अडीच वर्षांसाठी ही सोडत काढण्यात आली असून 29 महापालिकांपैकी 15 महापालिका विविध प्रवर्गातील महिलांसाठी राखीव झाल्या आहेत. अधिक माहिती आमच्या प्रतिनिधिकडून......

**पुणे, बृहन्मुंबई, नवी मुंबई, नांदेड-वाघाळा, मालेगाव, मीरा- भाईंदर, नागपूर, नाशिक आणि धुळे महापालिकेचं महापौरपद सर्वसाधारण खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित झालं आहे. तर छत्रपती संभाजीनगर, परभणी, सांगली-मिरज-कुपवाड, अमरावती, वसई-विरार, सोलापूर, पिंपरी-चिंचवड, आणि भिवंडी-निजामपूर महापालिकेचं महापौरपद सर्वसाधारण खुल्या प्रवर्गासाठी आहे. कल्याण-डोंबिवलीचं महापौरपद अनुसूचित जमातीसाठी राखीव ठेवण्यात आलं आहे. तर अनुसूचित जातीच्या तीन महापौर पदांपैकी लातूर आणि जालन्यात अनुसूचित जातीच्या महिला महापौर असतील तर ठाण्याचं महापौर पद अनुसूचित जातीसाठी राखीव असेल. अकोला, अहिल्यानगर, जळगाव आणि चंद्रपूरचं**

**महापौरपद ओबीसी म्हणजेच इतर मागासवर्गीय महिलांसाठी असणार आहे. उल्हासनगर, पनवेल, इचलकरंजी आणि कोल्हापूर महानगर पालिकेचं महापौर पद ओबीसी प्रवर्गासाठी असणार आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी मुंबईहून गौरीशंकर घाले यांच्यासह माधुरी कुलकर्णी पुणे.**

**जिल्हा परिषद**

राज्यातल्या 12 जिल्हा परिषदांमधल्या मिळून 125 पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठीच्या उमेदवारी अर्जांची काल छाननी झाली. जिल्हा परिषदांच्या 731 सदस्यांसाठी 7 हजार 695 उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. तर पंचायत समित्यांच्या 1 हजार 462 जागांसाठी 13 हजार 23 उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहेत. येत्या 27 तारखेपर्यंत अर्ज मागे घेता येतील. त्यानंतर उमेदवारांची अंतिम यादी आणि चिन्ह वाटप जाहीर होईल. येत्या 5 फेब्रुवारीला मतदान आणि 7 फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे.

**सामूहिक कवायत**

77 व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त येत्या 26 जानेवारीला राज्यातील सर्व माध्यमाच्या, सर्व व्यवस्थापनाच्या आणि सर्व शिक्षण मंडळाच्या शाळांमध्ये एकाचवेळी 'देशभक्तीपर गीतांवर सामूहिक कवायत' केली जाणार आहे. शासकीय ध्वजवंदन कार्यक्रमानंतर ही कवायत होईल. 'राष्ट्र प्रथम' या संकल्पनेवर आधारित या कवायतीमध्ये राज्यातल्या एक लाखांहून अधिक शाळांचे दोन कोटींपेक्षा जास्त विद्यार्थी भाग घेणार आहेत. शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी काल ही माहिती दिली. विद्यार्थ्यांना राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती, स्वयंशिस्त, आरोग्य जागृती, शारीरिक व्यायामासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशानं या कार्यक्रमाचं आयोजन केलं असल्याचं त्यांनी सांगितलं.

**त्रिभाषा समिती**

राज्यातल्या शाळांमध्ये त्रिभाषा धोरण निश्चित करण्यासंदर्भात शिक्षणतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखालील समितीला एक महिन्याची मुदतवाढ देण्यात आली आहे. शालेय शिक्षण विभागानं याबाबतचा शासन निर्णय जारी केला आहे. यापूर्वी या समितीला 4 जानेवारी पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. समितीच्या संकेतस्थळावर आलेल्या सूचना आणि प्रतिक्रियांवर विचार करून त्यापुढील कार्यवाहीसाठी आता 4 फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

**पिफ**

24 व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा म्हणजेच पिफचा काल समारोप झाला. गेल्या 24 वर्षांमध्ये पिफने महाराष्ट्राच्या संस्कृतीमध्ये मोलाची भर घातली आहे, राज्य सरकार या महोत्सवाला सर्वतोपरी मदत करत असल्याचं महाराष्ट्र चित्रपट आणि सांस्कृतिक रंगभूमी विकास प्राधिकरणाचे सह व्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजनीकर यांनी यावेळी सांगितलं.

समारोप समारंभात ज्येष्ठ अभिनेते बिस्वजित चॅटर्जी, ज्येष्ठ अभिनेत्री फरीदा जलाल आणि ज्येष्ठ अभिनेत्री आशा काळे यांना 'पीफ डिस्टींग्वीश ॲवार्ड', तर ज्येष्ठ व्हायोलिन वादक आणि संगीतकार अमर हलदीपूर यांना संगीतकार एस. डी. बर्मन आंतरराष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं. यावेळी आपल्या भावना व्यक्त करताना आशा काळे म्हणाल्या.....

**आजपर्यंत बरेच पुरस्कार मला मिळाले. प्रत्येक पुरस्काराच्या वेळी माझ्या मनामध्ये एकच विचार येत होता, तोच आजही आलेला आहे. तो म्हणजे रंगमंचावर आणि चित्रपटामध्ये मी जे जे काही बरं केलं, त्याला अत्यंत चांगलं म्हणून मला जे प्रोत्साहन दिलं, ते प्रोत्साहन दिलं ते माझ्या रसिक प्रेक्षकांनी. त्यांनी मला स्वीकार म्हणून मी आज पर्यंत टिकले, हेच प्रेम मला या पुढच्याही आयुष्यामध्ये माझ्या प्रेक्षकांकडून मिळावं एवढीच इच्छा व्यक्त करते.**

यंदाचा सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय चित्रपटाचा पुरस्कार 'द एलिशियन फील्ड' या चित्रपटाला, तर सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय मराठी चित्रपट पुरस्कार 'बाप्या' या चित्रपटाला प्रदान करण्यात आला. सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक पुरस्कार, 'गोंधळ' चित्रपटासाठी

संतोष डावखर यांना, तर बाप्या या चित्रपटासाठी गिरीश कुलकर्णी आणि राजश्री देशपांडे यांना सर्वोत्कृष्ट अभिनयाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**पुणे ग्रँड टूर**

पुणे ग्रँड टूर आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेचा चौथा आणि अंतिम टप्पा आज बालेवाडी ते बालगंधर्व रंगमंदिर या मार्गावर होणार आहे. स्पर्धेची सुरुवात दुपारी दीड वाजता म्हाळुंगे, बालेवाडी इथल्या श्री शिव छत्रपती क्रीडा संकुल इथून होणार आहे. या स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर आज पुणे शहर आणि परिसरातील प्रमुख रस्त्यांवरील वाहतुकीत बदल करण्यात आला आहे. नागरिकांना पर्यायी मार्गांचा वापर करण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. काल या स्पर्धेचा एकंदर 137 किलोमीटर लांबीचा टप्पा सासवड ते बारामती दरम्यान पार पडला. या टप्प्याच्या उद्घाटनाला उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते.

**प्रिसिसेन्स राष्ट्रीय कार्यशाळा**

हवामान बदलाच्या काळात पाण्याच्या अचूक व्यवस्थापनासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा अवलंब करणं आवश्यक आहे, असं प्रतिपादन जलशक्ती मंत्रालयाचे सचिव व्ही. एल. कांता राव यांनी काल पुण्यात केलं. केंद्रीय जल आणि विद्युत संशोधन केंद्रामध्ये आयोजित 'प्रिसिसेन्स 2026' या राष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. जलक्षेत्रात वापरली जाणारी जागतिक दर्जाची उपकरणं देशातच तयार करण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

**जवान अपघात**

जम्मू आणि काश्मीरमध्ये जवानांना घेऊन जाणाऱ्या गाडीला काल अपघात झाला; यात 10 जवानांचा मृत्यू झाला, तर 10 जवान गंभीर जखमी झाले आहेत. भद्रवाह - चंबा मार्गावर जवानांना घेऊन जाणारी गाडी खोल दरीत कोसळल्यानं हा अपघात झाला. या दुर्घटनेबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी दुःख व्यक्त केलं आहे. या कठीण काळात देश सशस्त्र दलांच्या आणि त्यांच्या कुटुंबियांच्या पाठीशी उभा आहे, असं राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे.

**क्रिकेट**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातला 20 षटकांचा दूसरा क्रिकेट सामना आज रायपूरमध्ये होणार आहे. पाच सामन्यांच्या या मालिकेतला पहिला सामना भारतानं जिंकला आहे.

**हवामान**

संपूर्ण राज्यात काल किमान तापमान सरासरीच्या आसपास होतं, येत्या 24 तासात राज्यात सर्वत्र कोरडं हवामान राहण्याचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.